महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

दैनिक जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ १२ जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३४४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

ठाणे | पुणे | कल्याण -डोंबिवली | नागपूर | नाशिक सह

# नऊ महापालिकांना प्रभाग रचनेचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठीच्या हालचालींना वेग आला असून त्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना प्रभाग रचना करण्याचे आदेश राज्य सरकानं दिले आहेत. अ, ब आणि क वर्ग महानगरपालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश सरकारने दिले आहेत. यामध्ये पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, वसई विरार, छत्रपती संभाजीनगर आणि कल्याण डोंबिवली सारख्या महापालिकांचा समावेश आहे.

राज्यात गेल्या तीन ते चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. त्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता त्यासंबंधी हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. या निवडणुकीसाठी प्रभाग रचना करण्यासंदर्भात राज्य सरकारने आदेश दिले आहेत. राज्यात ज्या ठिकाणी महापालिका निवडणुका घेण्यात येणार आहेत त्या ठिकाणी आता प्रभाग रचनेचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रभागांची रचना कशी करायची आणि लोकसंख्येचे काय निकष लावायचे याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

महाराष्ट्रातील महापालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश जारी करण्यात आल्यानंतर मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेमध्ये 227 एकसदस्यीय प्रभाग रचना करण्यात येणार आहे. तर पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवीमुंबई, पिंपरी चिंचवड, छ. संभाजीनगर, यासह इतर सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यांचे प्रभाग असणार आहेत.

मुंबईमध्ये आधी 227 प्रभाग होते. महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन 236 प्रभाग करण्यात आले. पुन्हा महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर 227 प्रभाग करण्यात आले. त्याला आव्हान सर्वोच्च न्यायालयात देण्यात आलं होतं. पण ती याचिका फेटाळण्यात आली. त्यामुळे मुंबईमध्ये 227 प्रभाग असणार आहेत.



# कल्याणमध्ये क्लस्टर योजनेचा मार्ग मोकळा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ठाण्याच्या धर्तीवर कल्याणमध्ये देखील क्लस्टर योजनेचा मार्ग मोकळा झाला असून याबाबत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ठाण्यात नुकतीच बैठक संपन्न झाली. या बैठकीला आमदार विश्वनाथ भोईर, आमदार राजेश मोरे, केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल, नगररचनाकार संतोष डोईफोडे, माजी महापौर वैजयंती गुजर घोलप, शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे, शहर प्रमुख निलेश शिंदे, माजी नगरसेवक मोहन उगले, विद्याधर भोईर, मल्लेश शेट्टी, रमेश म्हात्रे, जनार्दन म्हात्रे आदी पदाधिकारी उपस्थित होते. कल्याणचा विकास कसा होईल, रस्ते कसे मोठे होतील, मोठ्या इमारती कशा होतील, क्लस्टर योजना कशी राबवता येईल याबाबत चर्चा झाली. क्लस्टर योजनेमुळे शहराचा विकास होऊन गरिबातील गरीब नागरिकांना हक्काचे 325 स्केवर फूट क्षेत्रफळाचे घर मिळणार असल्याचे उगले यांनी सांगितले.

ठाणे शहरात क्लस्टर योजनेला मान्यता दिल्यानंतर कल्याण डोंबिवली शहरात देखील क्लस्टर योजनेला मंजुरी देण्याची मागणी होत होती. अखेर शासनाने डिसेंबर महिन्यात प्रसिद्ध केलेल्या डीसीरूल मध्ये कल्याण डोंबिवली सह आजूबाजूच्या शहरात क्लस्टर योजना राबविण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीत वेगाने वाढणारी वाहतूक आणि नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर रस्ता रुंदीकरण, आणि मैदाने, बगीचा यासारख्या सुविधा पुरविणे आवश्यक असले तरी जागेअभावी या विकास कामात अडथळे निर्माण होत होते.

आजमितीला शहरातील अनेक इमारती जीर्ण धोकादायक बनल्या आहेत. मात्र या इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रश्न रखडला होता. या इमारतीचा क्लस्टर योजनेतून विकास शक्य असल्यामुळे शहरात क्लस्टर योजना लागू करावी अशी मागणी केली जात होती. अखेर राज्य शासनाने कल्याण डोंबिवली महापालिकेचा देखील क्लस्टर योजनेत समावेश केल्याचे जाहीर केले आहे.

या योजनेतून १० हजार मीटर भूखंड असलेल्या जुन्या अधिकृत किंवा अनधिकृत इमारती किंवा चाळी एकत्र येत या भूखंडावर अधिकृत इमारत उभारणे शक्य होईल. या इमारतीसाठी ४ एफएसआय वापरता येऊ शकेल. १० हजार चौरस मीटरच्या भूखंडावर डीपी रस्त्यासाठी जागा, बगीचा, मैदाने यासाठी आवश्यक भूखंड राखीव ठेवत तितका एफएसआय बिल्डींगसाठी वापरता येणार असल्याने अग्निशमन विभागाकडून जितक्या मजल्याची इमारत उभारण्याची परवानगी दिली जाईल तितक्या मजल्याची इमारत उभारता येणार असल्याने धोकादायक इमारतीत जीव मुठीत घेऊन राहणाऱ्या नागरिकांना अधिकृत घरात राहण्याची संधी मिळणार असल्याचे उगले यांनी सांगितले.



थोडक्यात महत्वाचे

## मुरबाड तालुका खरेदी विक्री संघावर प्रशासकीय मंडळ नियुक्त

### आ. किसन कथोरेंनी १५ वर्षांनंतर तालुक्यातील सहकार विभागाकडे दिले लक्ष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड तालुका खरेदी विक्री संघावर नुकताच प्रशासकीय मंडळ नियुक्त करण्यात आलेले आहे. या संघाची भात खरेदी वादातीत झाली आहे. त्यातच या खरेदी विक्री संघाच्या पंच वार्षिक निवडणूकितील अनियमितता त्यामुळे संचालक मंडळ नसताना भात खरेदी केली गेली होती. यामुळे या खरेदीत मूळ शेतकऱ्यांना फायदा झाला नसल्याची तक्रार काही शेतकऱ्यांनी केली होती.याबाबत मार्केटिंग फेडरेशन व पनन विभागाने गम्भीर दखल घेत या खरेदी विक्री संघावर प्रशासकीय मंडळ नियुक्त करण्यात आलेले आहे. त्यामध्ये अध्यक्ष म्हणून संतोष पवार यांच्यासह अन्य दहा जणांचा समावेश आहे.

## मुंब्रा रेल्वे अपघातातील जखमींच्या संख्येत वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ सोमवारी झालेल्या रेल्वे दुर्घटनेत चार प्रवाशांना आपले जीव गमवावे लागले. तर, जखमी सात प्रवाशांवर ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तर सोमवारी रात्री उशिराने आणखी एक रुग्ण उपचारासाठी दाखल झाल्याने जखमींची संख्या आठ झाली आहे. दुसरीकडे जखमी रुग्णांपैकी मच्छिंद्र गोतारणे या रुग्णाला मेंदूचा त्रास जाणवू लागल्याचे त्यांना पुढील उपचारासाठी मुंबईतील जे.जे. रुग्णालयात हलविण्यात आले आहे, तर ३ रुग्णांवर मंगळवारी हाडाच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली. दिवा-मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान सोमवारी झालेल्या रेल्वे अपघातात जखमी झालेल्या जितेंद्र म्हात्रे (३२) या रुग्णाला उशिराने उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यामुळे जखमी प्रवाशांची संख्या ८ झाली आहे. दुसरीकडे वाशिंद येथे राहणारे मच्छिंद्र गोतारणे यांच्या डोक्याला मार लागला असल्याने मेंदूचा त्रास जाणवू लागला होता. त्यामुळे त्यांच्यावर पुढील उपचारासाठी मुंबईतील जे. जे. रुग्णालयात मंगळवारी हलविण्यात आले. तर, उर्वरित रुग्णालयात दाखल असलेल्या ७ जणांची प्रकृती स्थिर असली तरी, तीन रुग्णांवर हाडांच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. दिवा-मुंब्रा स्थानकादरम्यान घडलेल्या रेल्वे दुर्घटनेतील शिवा गवळी आणि अनिल मोरे या दोघांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांच्यावर ठाण्यातील खासगी रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. यामध्ये शिवा गवळी यांच्या प्रकृतीत काहीशी सुधारणा होत असून अनिल मोरे यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती तहसीलदार उमेश पाटील यांनी दिली.

## शिंदेच्या बालेकिल्ल्यात ठाकरेंचा जनदरबार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाण्यात कायमच जनता दरबारामुळे सुरू असलेल्या चढाओढीत आता ठाकरेंचा सहभाग झाल्याचे चित्र आहे. शिंदेच्या बालेकिल्ल्यात गुरूवारी, १२ जूनला ठाकरें गटाचा जनता दरबार भरणार आहे. ठाण्यातील शिवसेना चंदनवाडी शाखेत गुरूवारी सकाळी ११ वाजता हा जनता दरबार आयोजित करण्यात आला आहे. यावेळी शिवसेनेचे उपनेते नितीन मधुकर नांदगावकर, ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे, शिवसेना माजी खासदार राजन विचारे यांची उपस्थिती असणार आहे. नवी मुंबईतील भाजपचे नेते आणि राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी काही महिन्यांपुर्वी ठाण्यात जनता दरबार भरवण्यास सुरूवात केली. त्यानंतर शिवसेनाकडून (शिंदे गट) 'जन संवाद' हा उपक्रम राबविला जात असतानाच, आता मात्र शिंदेच्या बालेकिल्ल्यात शिवसेनेचे उपनेते नितीन नांदगांवकर यांचा जनता दरबार भरवला जाणार असल्याचे दिसून येत आहे.

## डोंबिवलीत मनसे-ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांचे मनोमिलन ?



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण शीळ रोडवरील पलावा पुलाच्या आंदोलनात मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष एकत्र आले. त्यानंतर ठाकरे बंधूची युती बाबत सर्वत्र पुन्हा चर्चा सुरु झाली. आता मनसेचे डोंबिवली शहराध्यक्ष थेट शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शाखेत गेले. तेथे त्यांनी ठाकरेंच्या शहराचे प्रमुखांची आणि पदाधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यामुळे मनसे-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मनोमिलन झाल्याच्या पुन्हा चर्चा आहेत. मनसेचे शहर अध्यक्ष राहुल कामत मंगळवारी डोंबिवली पश्चिमेकडील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या पक्षाच्या शाखेत गेले होते. त्यांनी ठाकरेंचे शहर प्रमुख प्रकाश तेलगोटे यांच्यासह ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांची भेट घेतली. यावेळी ठाकरे गटाचे शहर प्रमुख प्रकाश तेलगोटे यांनी कामत यांना शुभेच्छा देत पुष्पगुच्छ दिला. या भेटीचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.









## गीतासार



### अध्याय १३
### क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते । ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम्
॥ १३-१७ ॥

ते परब्रह्म ज्योतींची ज्योत आणि मायेच्या अत्यंत पलीकडे म्हटले जाते. तो परमात्मा ज्ञानस्वरूप, जाणण्यास योग्य आणि तत्त्वज्ञानाने प्राप्त होण्याजोगा आहे. तसेच सर्वांच्या हृदयात विशेषरूपाने राहिलेला आहे. ॥ १३-१७ ॥

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः । मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥ १३-१८ ॥

अशाप्रकारे क्षेत्र तसेच ज्ञान आणि जाणण्याजोगे परमात्म्याचे स्वरूप थोडक्यात सांगितले. माझा भक्त हे तत्त्वतः जाणून माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो. ॥ १३-१८ ॥

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि । विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसम्भवान्
॥ १३-१९ ॥

प्रकृती आणि पुरुष हे दोन्हीही अनादी आहेत, असे तू समज आणि राग-द्वेषादी विकार तसेच त्रिगुणात्मक सर्व पदार्थही प्रकृतीपासूनच उत्पन्न झालेले आहेत, असे समज. ॥ १३-१९ ॥

# केडीएमसी सुरु करणार सेमी- इंग्रजी शाळा

## - केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांची ग्वाही

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात 5 सेमी- इंग्लिश स्कुल या वर्षापासून सुरु करणार, अशी माहिती कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी त्यांच्या दालनात आज आयोजित पत्रकार परिषदेत उपस्थित पत्रकारांना दिली.

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी महापालिकेच्या प्रत्येक शाळेसाठी एका अधिकाऱ्यास पालक अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. या अधिकाऱ्यांकडून शाळा सुरू होण्याच्या दिवशीच प्रत्यक्ष भेट घेऊन पाहणी केली जाईल

.• शाळांमधील आनंददायी वातावरणासाठी महापालिकेच्या शाळांमध्ये BALA पद्धतीचे भित्तीचित्रांचे काम सुरू करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे शाळांची दुरुस्ती, रंगरंगोटी तसेच




**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून या शाळांना मुहूर्त**

फर्निचर देखील पुरविण्यात येणार आहे.

• पाठ्यपुस्तके व वह्या पहिल्या आठवड्यात वितरित करण्यात येतील. त्याचप्रमाणे दप्तर, मोजे, बुट हे देखील देण्यात येणार आहेत. गुणवत्ता पुर्ण शिक्षणासाठी *"निपूण"* अंतर्गत प्रार्थमिक शिक्षणावर भर दिला जाणार आहे. शैक्षणिक गुणवत्तेचे डिजिटल मॉनिटरिंग *"विनोबा भावे ॲप"* द्वारे करण्यात येणार आहे.संबंधित पालक अधिकाऱ्यांना नेमून दिलेल्या शाळेला नियमितपणे भेट देऊन प्रगतीचा आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे शिक्षकांसोबत आढावा बैठकांचे नियोजन करण्यात आले आहे.

महापालिका मुख्यालयात 24x7 आपत्कालीन नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून, तिथे रात्रपाळीची जबाबदारी उपआयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.सर्व प्रभाग कार्यालयांमध्येही आपत्कालीन कक्ष कार्यरत करण्यात आलेले आहेत.

• प्रत्येक प्रभागामध्ये स्वतंत्र आपत्कालीन पथक नियुक्त केले गेले असून, यामध्ये प्रभाग अधिकाऱ्यांसह इतर विभागांच्या अधिकाऱ्यांना देखील जबाबदारी देण्यात आलेली आहे. त्यामुळे सर्व अधिकाऱ्यांच्या समन्वयाने आपत्कालीन परिस्थितीत लवकर प्रतिसाद देणे, सुलभ होणार आहे.

• पावसाळयात उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी NDRF टीम महापालिका क्षेत्रात दाखल झाली असून, त्यांच्या स्तरावर देखील जनजागृती केली जाणार आहे.

• पावसाळी आपत्कालीन परिस्थितीत आपत्तीला तोंड देण्यासाठी महापालिका सज्ज असल्याची माहिती महापालिका आयुक्तांनी यावेळी दिली.

महापालिकेमध्ये 490 पदांची भरती होणार असून, भरती प्रक्रियेबाबत सर्व माहिती महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कुठल्याही समस्येसाठी हेल्पलाईन नंबर 0251-2303060 यावर संपर्क साधावा. भरती प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन आधारित व TCSच्या माध्यमातून घेतली जाणारी परीक्षा असेल

• फक्त महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरूनच माहिती उपलब्ध करून घ्यावी. नागरिकांनी कुठल्याही आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन महापालिका आयुक्तांनी केले.

कोविडच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने बाई रुक्मीणीबाई रुग्णालयात एकुण 10 बेडचे आणि शास्त्रीनगर रुग्णालयात एकुण 5 बेडचे विलगीकरण कक्ष तयार केले असून, महापालिकेकडे आरटीपीसीआर ,ॲन्टीजेन चाचणीसाठी किट्स उपलब्ध असून, नागरिकांनी खबरदारी घ्यावी.


▫कोणत्याही लक्षणांची शंका असल्यास घाबरून न जाता नजिकच्या महापालिकेच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असेही आवाहन महापालिका आयुक्तांनी केले.

# मुंबईचे शिल्पकार नाना शंकर शेठ यांच्या जन्मस्थळासंदर्भात गुगलकडून संभ्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड(बाळासाहेब भालेराव) :** मुंबईचे शिल्पकार भारतीय रेल्वेचे जगन्नाथ शंकर शेठ उर्फ मिरकुटे हे ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील भूमिपुत्र असल्याचा आजपर्यंतचा दावा गुगलने माहिती हटवून संभ्रमात काढले आहे १० फेब्रुवारी १८०३ रोजी नाना शंकर शेठ यांचा जन्म ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात नव्हे तर मुंबईतच झाल्याचा दावा गुगलने नुकताच टाकलेले माहितीतून समोर आला आहे त्यामुळे भारतीय रेल्वेचे जनक व मुंबईचे शिल्पकार नाना शंकर शेठ यांचा जन्म नेमका कोणत्या शहरातील असा संभ्रम आता मुरबाड करायला निर्माण झाला आहे गुगलने नुकताच टाकलेले माहितीतून दुहेरी माहिती नमूद करून सुरुवातीला नानांचा जन्म मुंबईतच तर दुसऱ्या उताऱ्यामध्ये नानांचा जन्म एका दैवज्ञ ब्राह्मण सोनार कुटुंबात झाल्याचे नमूद केले आहे आत्तापर्यंत नाण्यांचा जन्म फक्त ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात झाल्याचे गुगलवर माहिती प्रसिद्ध होत असतानाच अचानक गुगलने बदललेल्या नानांचा जन्म मुंबईतच यामुळे आता सार्थ अभिमान बाळगून बसलेल्या मुरबाड करायला मात्र या नव्या माहितीमुळे कोड्यात टाकले आहे सरकारने ताबडतोब याबाबतची माहिती प्रसारित करून नानांच्या नेमका जन्म मुरबाड ते मुंबई हे प्रसिद्ध करून खुलासा करावा अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते रमेश घरत बोलताना दिली आहे.


नाना शंकर शेठ म्हणजे मुरबाडचे भूमिपुत्र याचा सार्थ अभिमान बाळगून मुरबाडकरांना नाना हे आमचे भूमिपुत्र आहेत असा अभिमान बाळगून होते परंतु गुगलने प्रसारित केलेल्या नव्या माहितीमुळे आता हे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे त्यामुळे खरी माहिती यांचे समोर येण्यासाठी मुरबाड की मुंबई हे सरकारने ताबडतोब जाहीर करावे अशी भावना मुरबाड मधून जाणकार नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे



जीवन

जगन्नाथ शंकरशेट यांचा जन्म मुंबईत दैवज्ञ ब्राह्मण सोनार व्यापारी व सावकारी कुटुंबात झाला. ... 10 फेब्रुवारी 1803 (????) रोजी नाना शंकर शेठ यांचा जन्म झाला. ...

त्यांनी स्वतः मिळवलेल्या अमाप संपत्तीपैकी मोठा हिस्सा दान केला तसेच सार्वजनिक कामांकरीता खर्च करून टाकला.एक थोर समाजसेवक, शिक्षणप्रेमी व आधुनिक मुंबईच्या शिल्पकारांपैकी एक. त्यांचे पूर्ण नाव जगन्नाथ शंकरशेट मुर्कुटे, तथापि ते नाना शंकरशेट या नावानेच अधिक परिचित आहेत. त्यांचा जन्म एका दैवज्ञ ब्राह्मण सोनार व्यापारी कुटुंबात ठाणे जिल्ह्यातील मुरबाड गावी झाला. त्यांचे वडील व्यापारासाठी मुंबईस आले. म्हैसूरच्या १७९९ च्या टिपू-इंग्रज युद्धात वडिलांना अमाप पैसा मिळाला. आई भवानीबाई नानांच्या लहानपणीच वारली. नानांनी तिच्या स्मरणार्थ पुढे भवानी शंकर मंदिर व एक धर्मशाळा गोवालिया तलावाजवळ बांधली. नानांचे वडील १८२२ मध्ये वारले व तरुणपणीच त्यांच्यावर प्रपंचाची व व्यापाराची सर्व जबाबदारी पडली. नाना शंकरशेट यांनी जवळजवळ अर्धशतकाच्या कालावधीत मुंबईच्या व पर्यायाने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचा, राजकीय चळवळीचा आणि अनेकविध अशा लोककल्याणकारी सुधारणांचा पाया घातला. त्यांच्यावर स... जमशेटजी जिजीभाईची छाप पडली होती. हिंदवासियांत शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे, यासाठी एल्फिन्स्टनने १८२२ मध्ये हैंदशाळा व शाळापुस्तक मंडळी काढली, त्यांचे आधारस्तंभ नानाच होते. ही पहिली शैक्षणिक संस्था स. का. छत्रे यांच्या साह्याने स्थापिली. पुढे हिचे १८२४ मध्ये बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीत रूपांतर झाले. एल्फिन्स्टननंतर उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी




**दोन्ही ठिकाणी उल्लेख मुरबाड की मुंबई!**

> **रमेश घरत ठाणे मित्रः भारतीय रेल्वेचे जनक नाना शंकर शेठ उर्फ मिरकुटे यांचा जन्म ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात १० फेब्रुवारी १८०३ रोजी झाला अशी माहिती आतापर्यंत गुगलवर उपलब्ध होती केवळ ठाणे जिल्हा नाही तर महाराष्ट्र भारतातील वाचताना नागरिकांना माहित आहे की मुरबाड हेच नानांचे जन्मगाव अशी नोंद आतापर्यंत होती परंतु गुगलने या माहितीमध्ये बदल करून नानांचे जीवन परिचय मध्ये सध्या गुगलवर उपलब्ध असलेल्या माहितीनुसार नानांचा जन्म मुंबईतच झाला व मुरबाड मध्ये झाल्याचे नमूद केली आहे त्यामुळे नानांच्या जन्माची नोंद संभ्रमात टाकणारी आहे याबाबत सरकारने गुगलकडे विचारणा करून खुलासा करावा आशिया खंडातील पहिली लोकल आणणारे मुंबईचे शिल्पकार मुरबाडचे सुपुत्र असा नाना शंकर शेठ यांचा उल्लेख होता परंतु अचानक टाकलेल्या माहितीनुसार मुरबाडकरांमध्ये खळबळ माजली असून संभ्रमाचे वातावरण तयार झाले आहे**
>
> **- रमेश घरत/सामाजिक कार्यकर्ते/करचोंडे/मुरबाड**

# पडघ्यातील एक्सपर्ट क्लासच्या दहावीच्या विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत वाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा :** भिवंडी तालुक्यातील पडघा येथील एक्सपर्ट क्लासेसमधील योग्य मार्गदर्शनामुळे दहावी विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत भरघोस वाढ झाल्याने एक्सपर्ट क्लासेसचे शिक्षक, विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

क्लासचालक विनीत काशीनाथ शेलार व महेंद्र नामदेव चोरघे यांनी क्लासमधील विद्यार्थ्यांच्या एस. एस. सी. परिक्षेसाठी मोलाचे परिश्रम घेऊन केलेले योग्य नियोजन व मार्गदर्शनामुळे क्लासमधील मधील श्लोक दळवी याने ९३.८० टक्के, भावीक शेंडे याने ९२.८० टक्के , गौरव फर्डे ह्याने ९३ टक्के, तर वेदीका ठाणगे, रिद्धी विशे, वेदीका शेलार, यांनी ९२ टक्के विनीत पितांबरे याने ९१ टक्के, हर्ष पाटील याने ८९ टक्के, साहील भोईर यांने ८८ टक्के गुण मिळवले त्यामुळे एक्सपर्ट क्लासमधील विद्यार्थ्यांनी चांगली टक्केवारी मिळवून गुणवंत यादीत अव्वल स्थान पटकावले यावर्षी लागलेल्या एस. एस. सी. निकालात एक्सपर्ट क्लासमधील ७ विद्यार्थ्यांनी ९० टक्के, १५ विद्यार्थ्यांनी ८० टक्के, १८ विद्यार्थ्यांनी ७० टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले तर एक्सपर्ट क्लासमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक करीअर घडविण्यासाठी क्लासचालक अतिशय मेहनत घेत असल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी योग्य नियोजन व मार्गदर्शन करणाऱ्या एक्सपर्ट क्लासेसचे सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.


# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्ष

### ४ मीटरपेक्षा जास्त मोठी भरती येण्याचा दिनांक, वार, वेळ आणि उंची
(सौजन्य: महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड)

● जून २०२५ ●

| दिनांक | वार | वेळ | उंची(मी.) |
|---|---|---|---|
| ११.०६.२५ | बुधवार | १३:४८ | ०४.०२ |
| १२.०६.२५ | गुरुवार | १४:२३ | ०४.१० |
| १३.०६.२५ | शुक्रवार | १४:५५ | ०४.१३ |
| १४.०६.२५ | शनिवार | १५:२७ | ०४.१२ |
| १५.०६.२५ | रविवार | १६:०० | ०४.०८ |
| २३.०६.२५ | सोमवार | ११:५९ | ०४.३० |
| २४.०६.२५ | मंगळवार | १२:४८ | ०४.५६ |
| २५.०६.२५ | बुधवार | १३:३४ | ०४.७१ |
| २६.०६.२५ | गुरुवार | १४:१८ | ०४.७४ |
| २७.०६.२५ | शुक्रवार | १४:५९ | ०४.६७ |
| २८.०६.२५ | शनिवार | १५:३७ | ०४.५० |
| २९.०६.२५ | रविवार | १६:१३ | ०४.२७ |
| ३०.०६.२५ | सोमवार | १६:४६ | ०४.०१ |

● जुलै २०२५ ●

| दिनांक | वार | वेळ | उंची(मी.) |
|---|---|---|---|
| १०.०७.२५ | गुरुवार | १३:२९ | ०४.०१ |
| ११.०७.२५ | शुक्रवार | १४:०५ | ०४.१४ |
| १२.०७.२५ | शनिवार | १४:३८ | ०४.२२ |
| १३.०७.२५ | रविवार | १५:११ | ०४.२५ |
| १४.०७.२५ | सोमवार | १५:४३ | ०४.२४ |
| १५.०७.२५ | मंगळवार | १६:१८ | ०४.१८ |
| १६.०७.२५ | बुधवार | १६:५७ | ०४.०५ |
| २२.०७.२५ | मंगळवार | ११:४५ | ०४.१९ |
| २३.०७.२५ | बुधवार | १२:३३ | ०४.४१ |
| २४.०७.२५ | गुरुवार | १३:१७ | ०४.५४ |
| २५.०७.२५ | शुक्रवार | १३:५८ | ०४.५६ |
| २६.०७.२५ | शनिवार | १४:३५ | ०४.५० |
| २७.०७.२५ | रविवार | १५:०९ | ०४.३८ |
| २८.०७.२५ | सोमवार | १५:३९ | ०४.२१ |
| २९.०७.२५ | मंगळवार | १६:०७ | ०४.०१ |

● ऑगस्ट २०२५ ●

| दिनांक | वार | वेळ | उंची(मी.) |
|---|---|---|---|
| ०८.०८.२५ | शुक्रवार | १३:०६ | ०४.०२ |
| ०९.०८.२५ | शनिवार | १३:४२ | ०४.२० |
| १०.०८.२५ | रविवार | १४:१५ | ०४.३२ |
| ११.०८.२५ | सोमवार | १४:४८ | ०४.३८ |
| १२.०८.२५ | मंगळवार | १५:२० | ०४.३८ |
| १३.०८.२५ | बुधवार | १५:५३ | ०४.२९ |
| १४.०८.२५ | गुरुवार | १६:२९ | ०४.१२ |
| २०.०८.२५ | बुधवार | ११:२८ | ०४.०३ |
| २१.०८.२५ | गुरुवार | १२:१४ | ०४.२० |
| २२.०८.२५ | शुक्रवार | १२:५५ | ०४.३१ |
| २३.०८.२५ | शनिवार | १३.३२ | ०४.३३ |
| २४.०८.२५ | रविवार | १४:०५ | ०४.३० |
| २५.०८.२५ | सोमवार | १४:३४ | ०४.२१ |
| २६.०८.२५ | मंगळवार | १५:०१ | ०४.०९ |

● सप्टेंबर २०२५ ●

| दिनांक | वार | वेळ | उंची(मी.) |
|---|---|---|---|
| ०६.०९.२५ | शनिवार | १२:३५ | ०४.०४ |
| ०७.०९.२५ | रविवार | १३:११ | ०४.२४ |
| ०८.०९.२५ | सोमवार | १३:४५ | ०४.३८ |
| ०९.०९.२५ | मंगळवार | ०२:१० | ०४.०६ |
| ०९.०९.२५ | मंगळवार | १४:१८ | ०४.४४ |
| १०.०९.२५ | बुधवार | ०२:५३ | ०४.१८ |
| १०.०९.२५ | बुधवार | १४:५२ | ०४.४१ |
| ११.०९.२५ | गुरुवार | ०३:३६ | ०४.१९ |
| ११.०९.२५ | गुरुवार | १५:२६ | ०४.२७ |
| १२.०९.२५ | शुक्रवार | ०४:२३ | ०४.०८ |
| १२.०९.२५ | शुक्रवार | १६:०२ | ०४.०२ |
| २०.०९.२५ | शनिवार | १२:२४ | ०४.०३ |
| २१.०९.२५ | रविवार | १२:५८ | ०४.०६ |
| २२.०९.२५ | सोमवार | १३:२७ | ०४.०४ |

| नियंत्रण कक्ष | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|
| जवाहर बाग अग्निशमन केंद्र | १०१/२५३३४२१६/२५३३१६०० |
| कोपरी अग्निशमन केंद्र | २५३२५३१३ |
| वागळे इस्टेट अग्निशमन केंद्र | २५८२३४७७/२५८२३५४७/ २५८२०६६० |
| बाळकूम अग्निशमन केंद्र | २५३६६४०१/२५३६६७०२ |
| ओवळा अग्निशमन केंद्र | ७७१००४८९६४/७७१०००८९६४ |
| मुंब्रा अग्निशमन केंद्र | २५४६२४४४/२५४६२४२४ |
| पांचपाखाडी अग्निशमन केंद्र | २५४४०७९८/२५४४०७९९/ २५३३१३९९ |
| रुस्तमजी अग्निशमन केंद्र | २५४४००२० |
| शिळ अग्निशमन केंद्र | ७३०४९३९१०१/७३०४४६२१०१/ ७३०४४९३१०१ |
| जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, ठाणे | १०७७/२५३८१८८६/ फॅक्स-२५३४९२०० |
| ठाणे पोलिस नियंत्रण कक्ष | २५४४२८२८/३५३५/३६३६ |
| शहर वाहतुक नियंत्रण कक्ष | ८२८६ ३०० ३०० / ४०० ४०० |
| शासकीय रुग्णवाहिका सेवा | १०८ |
| नौपाडा-कोपरी प्रभाग समिती | २५३२५१६६/२५३३४४७१ |
| उथळसर प्रभाग समिती | २५४७३५६८/२५४७३५४१ |
| वागळे इस्टेट प्रभाग समिती | २५८२६८९१/२५८२७९१४ |
| लोकमान्य-सावरकरनगर प्र.स. | २५८८५०४३/२५८८५८०१ |
| वर्तकनगर प्रभाग समिती | २५८८५८०१/२५८८५०४३ |
| मा.मानपाडा प्रभाग समिती | २५४४७२२०/२५४०२३७५ |
| कळवा प्रभाग समिती | २५४१०४७० |
| दिवा प्रभाग समिती | ९३२१५९७७७१ |

हेल्पलाईन - ०२२ २५३७१०१० | भ्रमणध्वनी - ८६५७८८७१०१/८६५७८८७१०२
Email:rdmc@thanecity.gov.in | Website:www.thanecity.gov.in

*जावक क्रमांक : ठामपा/पिआरओ/जाहिरात/३४५/२०२५-२६ दिनांक: ११/०६/२०२५

# मच्छिमारांचा विरोध डावलून एमएमआरडीए उत्तन-विरार सागरी सेतूवर ठाम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मिरा-भाईंदर :** प्रस्तावित उत्तन-विरार सागरी सेतू रद्द करत, त्याऐवजी दहिसर-भाईंदर लिंक रोडचा विरारपर्यंत विस्तार करण्याची मागणी केली जात आहे. सागरी सेतूमुळे मासेमारी व्यवसाय धोक्यात येणार असल्याने, त्याला मच्छिमारांकडून विरोध दर्शवला जात आहे. यातच आता सागरी सेतूसाठी सर्वेक्षण हाती घेण्याचा निर्णय 'एमएमआरडीए'कडून घेण्यात आला आहे. विरोधानंतरही सागरी सेतू उभारण्यावर राज्य सरकार ठाम असल्याचे समोर आले आहे.

### पहिल्या टप्प्यात उत्तन-विरार, दुसऱ्या टप्प्यात विरार-पालघर

पालघर जिल्ह्यातील नागरिकांना मुंबईला कमी वेळेत पोहोचता यावे, यासाठी पहिल्या टप्प्यात उत्तन-विरार आणि दुसऱ्या टप्प्यात विरार-पालघर असा सागरी सेतू 'एमएमआरडीए'च्या माध्यमातून उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी येणाऱ्या ८७ हजार ४२७ कोटींच्या खर्चास मंजुरीही देण्यात आली आहे. या मार्गासाठी समुद्र किनारपट्टीपासून सुमारे एक किमी आत पूल उभारला जाणार आहे.



परिणामी मासेमारी व्यवसाय धोक्यात येणार असून, समुद्र किनारपट्टीवरील उत्तनसह पालघर जिल्ह्यातील अनेक गावांतील मच्छिमारांवर बेरोजगारीची वेळ येण्याची भीती वर्तवली जात आहे. म्हणून, सेतू जाणाऱ्या लगतच्या गावातील मच्छिमारांकडून त्याला विरोध दर्शवला जात आहे. तसेच हा प्रकल्प रद्द करत, वर्सोव्यापासून दहिसरपर्यंत व पुढे भाईंदरपर्यंत येणाऱ्या लिंक रोडचा विरारपर्यंत विस्तार करण्याची मागणी केली जात आहे. याबाबत परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची उन्नतमधील मच्छिमारांची काही दिवसांपूर्वी भेटही घेतली होती.

**एमएमआरडीएचा सर्वेक्षणाचा निर्णय**

**मात्र, त्यानंतरही आता प्रकल्पाचा सामाजिक प्रभाव मूल्यांकन अभ्यासासाठी सर्वेक्षणाचा निर्णय 'एमएमआरडीए'कडून घेण्यात आला आहे. जूनपासून पुढील तीन महिने हे सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यासाठी सर्वेक्षण करणाऱ्या संस्थेला आवश्यक सहकार्य करण्याची विनंती 'एमएमआरडीए' कडून मिरा-भाईंदर महापालिका आणि पालघर जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणांकडे पत्राद्वारे करण्यात आली आहे.**

### मच्छिमारांची घरेही बाधित होण्याची शक्यता

**उत्तन-विरार सागरी सेतू हा उत्तन, वसई आणि विरार अशा तीन रस्त्यांनी जोडला जाणार आहे. उत्तनमधील जोडरस्ता सुमारे साडेनऊ किमी लांबीचा, तर सहा पदरी रुंद असणार आहे. उत्तन किनाऱ्याला लागून शेकडो मच्छिमारांची घरे आहेत. ही बाब लक्षात घेता, सागरी सेतूच्या कामात अनेक मच्छिमारांची घरेदेखील बाधित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे सागरी सेतू उध्वस्त करणारा ठरणार असल्याचे मत मच्छिमारांकडून व्यक्त केले जात आहे.**

# मैदान वाचवण्यासाठी नवी मुंबईत शेकडो ग्रामस्थांचा मोर्चा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**तुर्भे, ता. ११ (बातमीदार) :** विकास आराखड्यातून खेळाचे मैदान रद्द करण्याच्या मागणीसाठी जुईनगर आणि शिरवणे ग्रामस्थांनी महापालिकेच्या विरोधात बुधवारी (ता. ११) धडक मोर्चा काढला होता. मैदान वाचवण्यासाठी नवी मुंबईतील शेकडोहून अधिक ग्रामस्थ मोर्चात सहभागी झाले होते. या वेळी मोर्चेकऱ्यांनी 'मैदान आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे' अशा घोषणा देत पालिका प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला.

जुईनगर सेक्टर २१ येथे असलेल्या भूखंडावर आतापर्यंत मैदानाचे आरक्षण होते. त्यानुसार येथील नागरिक खेळासाठी, फिरण्यासाठी या मैदानाचा वापर करीत आले आहेत; मात्र मुंबई उच्च न्यायालयात २०२४ मध्ये दाखल झालेल्या जनहित याचिकेचा दाखला घेत या ठिकाणची माती काढण्यासाठी निविदा मागवण्यात आली होती. त्यानंतर या मैदानावर असलेले आरक्षण लक्षात आणून दिल्यावर ही निविदा थांबवण्यात आली होती. शहर विकास आराखडा मंजुरीसाठी गेलेला असताना आणि त्यावर कोणताही निर्णय आलेला नसताना, या भूखंडाचे आरक्षण बदलण्यात आले. आता पुन्हा या भूखंडावरील माती काढण्याचे काम सुरू होत आहे. केवळ कंत्राटदाराचा फायदा करून देण्यासाठी महापालिका अधिकारी हे काम करीत आहेत, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या वेळी माजी नगरसेवक एम. के. मढवी, माजी नगरसेवक काशिनाथ पाटील, माजी नगरसेविका माधुरी सुतार यांच्यासह असंख्य ग्रामस्थ मोर्चात सहभागी झाले होते.

> मोर्चामध्ये असणारी गर्दी पाहता मैदान किती गरजेचे आहे, हे स्पष्ट होत आहे. मैदान आहे तिथेच राहिले पाहिजे, ही आमची प्रमुख मागणी आहे. आजचा मोर्चा हा कोणा एका व्यक्तीचा नसून समस्त खेळाडूंचा आहे. त्यामुळे विकास आराखड्यातून मैदान रद्द करून मैदान आहे तसेच ठेवावे.
>
> - डॉ राजेश पाटील, नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष, भाजप

# अंबरनाथ मध्ये दुचाकी शोरूमला भीषण आग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : कल्याण-बदलापूर मार्गावरील आयुध निर्माणीसमोरील परिसरात असलेल्या एका नामांकित कंपनीच्या दुचाकी शोरूमला मंगळवारी मध्यरात्री भीषण आग लागली. या आगीत शोरूममधील ५० हून अधिक दुचाकी जळून खाक झाल्या आहेत. दुकान मालकाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. या घटनेत कोणतीही जिवितहानी झालेली नाही. दुचाकीचे शोरूम कल्याण-बदलापूर मार्गावर आयुध निर्माणीच्या समोर आहे. शोरूमच्या तळ आणि पहिल्या मजल्यावर विक्रीसाठी अनेक नवीन दुचाकी ठेवण्यात आल्या होत्या. मंगळवारी रात्री शोरूम बंद करण्यात आल्यानंतर, पहाटे साधारण तीन वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. शोरूममधील सुरक्षा रक्षकाने तातडीने अंबरनाथ अग्निशमन दलाशी संपर्क साधला. अग्निशमन दलाचे पथक त्वरित घटनास्थळी दाखल झाले, परंतु आगीच्या तीव्रतेमुळे अंबरनाथ अग्निशमन दलासह आयुध निर्माणी, आनंद नगर एमआयडीसी आणि उल्हासनगर महापालिकेच्या अग्निशमन पथकांनाही पाचारण करण्यात आले.

# ठाणे महापालिकेत चार सदस्यांचा एक प्रभाग

## नगरविकास विभागाचा नवा अध्यादेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. ११ :** महापलिका निवडणुकांचे पडघम वाजण्यास सुरुवात झाली आहे. नुकताच सरकारच्या नगरविकास विभागाने नवा अध्यादेश काढला आहे.

या अध्यादेशानुसार ठाणे पालिका प्रशासन कामाला लागली आहे. २०१७ मध्ये ज्या पद्धतीने चार सदस्यांचा एक प्रभाग होता, त्याच पद्धतीने रचना करण्याचा कार्यक्रम पालिका हाती घेतला जाणार आहे, अशी माहिती महापालिका सूत्रांनी दिली. त्यामुळे ठाणे पालिका निवडणुकीत चार सदस्यांचा एक प्रभाग अशीच रचना असल्याचे म्हटले जात आहे.

गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजण्यास सुरुवात झाली आहे. चार सदस्यीय पॅनेल पद्धतीनेच प्रभाग रचना करण्याचा अध्यादेशच काढण्यात आला आहे. चार सदस्यीय पॅनेल पद्धतीत २०११ ची लोकसंख्या गृहीत धरून २०१७ चा जूना पॅटर्नच गृहीत धरण्यात येणार असल्याने ही रचना आधीच ठाणे महापालिकेकडे तयार आहे, परंतु आता लोकसंख्याही २५ लाखांच्या पुढे गेली आहे. तसेच मतदारांच्या संख्येतही वाढ झाली आहे. त्यामुळे चार सदस्यीय प्रभागात एक प्रभाग हा किमान ३० ते ३५ हजार व ५५ ते ६० हजारांपर्यंत मोठा प्रभाग जाणार असल्याची माहिती महापालिका सूत्रांनी दिली. त्यानुसार प्रभागांची रचना बदलणार असल्याचे म्हटले जात आहे.

पूर्वी महाविकास आघाडी सरकारच्या काळात तीन सदस्यीय पॅनेल पद्धतीने निवडणुका घेण्याचे जाहीर केले होते. त्यादृष्टीने पालिकेने मागील वर्षी जुलै महिन्यात आरक्षण सोडत काढून निवडणुकीची प्रक्रियादेखील पूर्ण केली होती. ही सर्व प्रक्रिया पूर्ण करून राज्य सरकारकडेदेखील मंजुरीसाठी पाठवली होती; मात्र महाविकास आघाडीच्या सरकारनंतर महायुती सत्तेत आल्यानंतर निवडणूक चार सदस्यीय पॅनेल पद्धतीने घेण्याची घोषणा करण्यात आली होती.

# नवी मुंबई पोलिसांची वेबसाईट झाली युजर फ्रेंडली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई, ता. ११ :** नवी मुंबई पोलिस दलाने तंत्रज्ञानाच्या मदतीने नागरी सेवा अधिक सुलभ व कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने मोठे पाऊल उचलले आहे. त्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी आपल्या अधिकृत वेबसाइटमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. या नव्या वेबसाइटमध्ये अनेक नव्या सुविधा समाविष्ट करून ती अधिक सुरक्षित व यूजरफ्रेंडली बनवण्यात आली आहे. हे बदल नागरिकांच्या वेळेची बचत, कार्यपद्धतीतील पारदर्शकता आणि पोलिस दलाबाबतचा विश्वास वाढवण्यासाठी महत्त्वाचे ठरत आहे. या नव्या वेबसाइटमुळे नवी मुंबई पोलिसांची प्रतिमा अधिक सकारात्मक होत असून, इतर जिल्ह्यांसाठी ते दिशादर्शक ठरत आहे.

> **डिजिटल युगात पोलिस प्रशासनाकडून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांसोबत सुसंवाद साधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून पोलिसिंग अधिक पारदर्शक व जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याच उद्देशाने लोकांना जलद, पारदर्शक आणि सहज सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने नवी मुंबई पोलिसांचे संकेतस्थळ अद्ययावत करण्यात आले आहे. हे संकेतस्थळ हाताळण्यास अधिक सुलभ करून देण्यात आले असून, हे संकेतस्थळ दिशा दाखवणारे महत्त्वाचे माध्यम ठरेल.**
>
> ■ मिलिंद भारंबे, पोलिस आयुक्त, नवी मुंबई

तंत्रज्ञानाच्या साह्याने नागरिकांना सेवा-सुविधा देण्यामध्ये पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणण्यासाठी नवी मुंबई पोलिस दल कायम अग्रेसर राहिले आहे. नवी मुंबई पोलिस दलाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करण्यावर भर देऊन पोलिस दलात अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू केले आहेत. या उपक्रमाच्या दैनंदिन वापरामुळे पोलिसांच्या कामात सुसूत्रता व पारदर्शकता येण्यास मदत झाली आहे. त्यातच आता मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याच्या अनुषंगाने नवी मुंबई पोलिसांच्या वेबसाइटमध्ये अनेक नव्या सोयी-सुविधा समाविष्ट करून ती अद्ययावत करण्यात आली आहे. त्यामुळे ही वेबसाइट अधिक यूजरफ्रेंडली झाली आहे.

### वेबसाइटचे नव्याने डिझाइन

**वेबसाइटचा इंटरफेस आता अधिक आकर्षक, मोबाईलफ्रेंडली आणि बहुभाषिक बनवण्यात आला आहे. इंग्रजीसोबतच मराठी भाषेतही सेवा उपलब्ध असल्यामुळे अधिकाधिक नागरिकांना या सुविधांचा लाभ घेता येणार आहे. पोलिस भरती, जनजागृती व कार्यक्रमांची माहिती, इच्छुक उमेदवारांना पोलिस भरतीसंदर्भातील जाहिराती, पात्रता निकष, अर्ज प्रक्रिया यांची माहिती वेबसाइटवर मिळणार आहे. पोलिस विभागाद्वारे राबवण्यात येणाऱ्या जनजागृती मोहिमा व उपक्रमांचा तपशीलही नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे.**

# कल्याण शहराचा पाणीपुरवठा पूर्ववत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण –** दोन दिवसांपासून कल्याण पश्चिमेचा पाणी पुरवठा ठप्प होता. त्यामुळे नागरिकांचे हाल झाले. टँकरने पाणी पुरवठा करणाऱ्या पालिकेच्या केंद्रावर नागरिकांची झुंबड उडाली होती. तात्काळ टँकर मिळत नसल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. दिवसभर नागरिकांनी पालिका पाणी पुरवठा अधिकाऱ्यांना संपर्क करून भंडावून सोडले. अखेर मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास कल्याण पश्चिमेचा पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला.

कल्याण पश्चिम शहराला पाणी पुरवठा करणारी सुमारे तीस वर्षाहून अधिक काळाची एक जलवाहिनी कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक भागातील महम्मद अली चौकातून गेली आहे. ही वाहिनी पुष्पराज हॉटेल समोर आहे. ही जलवाहिनी पालिका स्थापनेच्याआधी टाकली असण्याचा अंदाज आहे. या जलवाहिनीच्या बाजुला काँक्रीटचा थर आहे. वाहिनी जुनाट झाल्याने आणि वाहिनीच्या तुलनेत पाणी वहन क्षमतेचा भार अधिक असल्याने महम्मद अली चौकातील जुनाट जलवाहिनी रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास काँक्रीटच्या अति भाराने फुटली. ही वाहिनी भूमिगत असल्याने जलवाहिनी फुटल्याचे पाणी पुरवठा विभागाच्या तात्काळ निदर्शनास आले नाही. सोमवारी हा प्रकार अधिकाऱ्यांच्या लक्षात आला. या वाहिनीवरून कल्याण पश्चिमेला पाणी पुरवठा होत असल्याने कल्याण पश्चिमेचा पाणी पुरवठा दोन दिवस ठप्प झाला होता.

अखेर अधिकाऱ्यांनी सदर वाहिनी वेल्डिंगच्या साहाय्याने जोडून फुटलेल्या जलवाहिनीला जोडण्याचे काम मंगळवारी रात्री पूर्ण केले. मध्यरात्रीनंतर कल्याण पश्चिमेचा पाणी पुरवठा सुरू करण्यात आला. बुधवारी सकाळी नागरिकांना पुरेशा दाबाने पाणी मिळाले.

# समृद्धी महामार्ग व्यवस्थापनाचा फुगाळे गावावर अन्याय

## गावाच्या हद्दीतील बोगद्याला इगतपुरीचे नाव




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर, ता. ११ (वार्ताहर):** तालुक्यातून जाणाऱ्या मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर राज्यातील सर्वात मोठा बोगदा फुगाळे गावाच्या हद्दीत उभारला आहे, परंतु या बोगद्याला इगतपुरीचे नाव देण्यात आले. त्यामुळे फुगाळे गावाच्या नावासाठी ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत.

समृद्धी महामार्गावरील बोगद्याला फुगाळे गावाचे नाव द्यावे, यासाठी महिनाभरापासून एमएसआरडीसीकडे निवेदन दिले होते. त्यानंतर फुगाळे ग्रामपंचायतीचा ग्रामसभा ठराव, वन विभागाचे शिफारस पत्र, स्थानिक खासदार, आमदारांचे शिफारस पत्र रस्ते विकास महामंडळाच्या कार्यालयात जमा करा, अशा सूचना अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना दिल्या होत्या. त्यानुसार कागदपत्रे जमा करण्यात आली आहेत, मात्र असे असताना बोगद्याला इगतपुरीचे नाव देण्यात आले आहे. त्यामुळे फुगाळे गावाचे नाव देण्यासाठी आंदोलनाचा इशारा सरपंच जिवा भला यांनी दिला आहे.

व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांना निवेदन देण्यात आले आहे, परंतु संबंधित प्रशासनाने फुगाळेवासीयांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. या महाकाय बोगद्याला इगतपुरी बोगदा नाव देण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# वज्रेश्वरीत स्वच्छ भारत अभियानाचा फज्जा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वज्रेश्वरी, ता. ११ (बातमीदार): गावातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास शासनाने निर्मल भारत आणि स्वच्छता अभियान सुरू केले आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून शासनाने 'स्वच्छ भारत मिशन' ही मोहीम सुरू केली आहे, मात्र भिवंडी तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक ग्रामपंचायतींच्या स्वच्छता मोहिमेची गती मंदावली आहे.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान निर्मलग्राम, हगणदारीमुक्त गाव पाठोपाठ शासनाने ग्रामीण भागात 'स्वच्छ भारत मिशन' अभियान सुरू केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून सर्व गावे कचरामुक्त करण्याचा संकल्प पूर्णत्वास असल्याचे बोलले जात आहे. ग्रामीण भागातील हगणदारीमुक्त करण्यासाठी घरात शौचालये बांधण्यावर जोर दिला गेला आहे. ही योजना पारदर्शक पद्धतीने राबविल्याने गाव परिसर स्वच्छ ठेवून आरोग्य निरोगी ठेवता येऊ शकते, पण तालुक्यातील ग्रामीण भागांचे वास्तव वेगळेच आहे.

या अभियानाच्या मूळ उद्देशालाच ग्रामीण भागात हरताळ फासण्यात आला आहे. शौचालये, घंटागाडीतून कचऱ्याचे व्यवस्थापन अनिवार्य असताना रस्त्यालगत जागोजागी कचरा फेकला जात आहे. त्यामुळे अनेक भागांत कचऱ्याचे ढीग साचले असून, आरोग्य धोक्यात आहे.

ग्रामीण भागात घरातील घनकचरा टाकण्यासाठी ग्रामपंचायतींनी ठोस उपाययोजना केल्या नसल्याने नागरिकांना नाइलाजाने गावातील रस्त्यावर तसेच सार्वजनिक ठिकाणांवर कचरा टाकावा लागतो. तसेच गटारींची सोय नसल्याने कचऱ्यात मुरणाऱ्या सांडपाण्यामुळे घाणीचे साम्राज्य , दुर्गंधी पसरते. यामुळे रोगराई पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

# शेलार गावाच्या हद्दीत कामवारी नदीपात्रात अतिक्रमण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


भिवंडी, ता. ११ (वार्ताहर)

शेलार गावाच्या हद्दीत कामवारी परिसरात शासकीय जागेवर पत्रे अतिक्रमण करण्यात आले आहे. स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याची तक्रार ग्रामस्थ मोनिश गायकवाड यांनी केली आहे. कामवारी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे, दूषित पाणी सोडण्याच्या तक्रारी आहेत. अशातच काही वर्षांपूर्वी दुर्घटनाग्रस्त झालेल्या सार्वजनिक शौचालय परिसरात अतिक्रमण सुरू आहे. त्यामुळे पालिकेने या प्रकरणात कारवाई करावी, अशी मागणी मोनिश गायकवाड यांनी केली आहे. तर पालिका प्रशासनाने कोणते बांधकाम सुरू असेल तर तत्काळ माहिती घेऊन अतिक्रमण हटविण्यात येईल, अशी माहिती शेलार ग्रामपंचायतीचे प्रशासक सुधाकर सोनवणे यांनी दिली आहे.

# मिरा-भाईंदर मनपाच्या बसगाड्यांची देखभाल दुरुस्ती वाऱ्यावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मिरा-भाईंदर शहरात महापालिकेची स्वतंत्र परिवहन बससेवा कार्यरत आहे. सध्या महापालिकेकडे ९० हून अधिक बसगाड्या असून त्याची जबाबदारी कंत्राटदारावर सोपवण्यात आली आहे. प्रशासनाने निश्चित केलेल्या मार्गांवर या बसगाड्या धावत आहेत. मात्र, यातील अनेक बसगाड्या तांत्रिकदृष्ट्या खराब अवस्थेत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे रस्त्यावर धूर पसरत असून प्रवाशांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. दोन दिवसांपूर्वी भाईंदर



(पूर्व) रेल्वे स्थानकाहून एल. आर. तिवारी कॉलेज परिसरात जाणारी क्रमांक १२ ची परिवहन बस मोठ्या प्रमाणात धूर सोडत असल्याचे दिसून आले. ही बस दाट रहदारीच्या मार्गांवरून जात असल्यामुळे तिच्या मागून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्रास सहन करावा लागला असल्याचे प्रवाशांनी सांगितले. शासकीय बस इतकी नादुरुस्त अवस्थेत असूनही ती सर्रास रस्त्यावर धावत असताना वाहतूक पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

### बसगाड्यांच्या दुरुस्तीकडे कंत्राटदाराची पाठ

मिरा-भाईंदर महापालिकेने परिवहन बसगाड्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी घोडबंदर येथे एक आधुनिक बस आगार उभारले आहे. येथे बसगाड्यांच्या दुरुस्तीसाठी स्वतंत्र गॅरेजची व्यवस्था आहे. तसेच, रस्त्यावर अचानक बंद पडणाऱ्या बसगाड्यांसाठी एक विशेष दुरुस्ती बस खरेदी करून ठेवण्यात आली आहे.

प्रशासनाकडून कंत्राटदाराला प्रवाशांच्या सुरक्षित व प्रदूषणमुक्त प्रवासासाठी बसगाड्यांची नियमित देखभाल आणि वेळेवर दुरुस्ती करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, कंत्राटदार याकडे दुर्लक्ष करत असून नादुरुस्त बसगाड्या सर्रासपणे रस्त्यावर चालवत असल्याचे चित्र दिसून येत आहे



## कोयना पंचरत्न प्रकल्पग्रस्त कदम परिवाराची कार्यकारिणी जाहीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता • कल्याण: कोयना प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या समस्या सोडवण्याकरिता, सामाजिक, शैक्षणिक तसेच इतर क्षेत्रात कदम परिवाराचा ठसा उमटवण्याकरिता ठाणे, रायगड जिल्ह्यातील पाचगाव कदम ग्रामस्थ एकत्र आले आहेत. गावातील ग्रामस्थांच्या उद्भवणाऱ्या समस्या शासन दरबारी सोडवण्याकरिता वेळे, करंजवडे, जांब्रुक, रोहिणे, भवानी नगर या पाच गावातील नागरिकांनी एकत्र येत कोयना पंचरत्न प्रकल्पग्रस्त कदम परिवार या संघटनेची स्थापना करून कार्यकारिणीची देखील निवड केली.

ठाण्यातील विश्राम गृह येथे नुकतेच आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत कोयना पंचरत्न प्रकल्पग्रस्त कदम परिवाराच्या कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष : मुकुंद कदम (वेळे), उपाध्यक्ष : संजय कदम (भवानी नगर), सचिव : सदानंद कदम ( जांब्रुक ) वांवढळ, खजिनदार : अमोल



कदम ( करंजवडे/भिवंडी), सहसचिव : सूर्यकांत कदम (रोहिणे/ आनगाव ), सहखजिनदार : मंदार कदम ( वेळे), तसेच कार्यकारिणी सदस्य पदी सुनील कदम (वेळे), प्रमोद पवार (भवानी नगर), संतोष कदम (जांब्रुक/वावंढळ), बाळकृष्ण कदम, अनंत कदम, भगवान कदम (रोहिणे/ माणगाव), सुभाष कदम (धरणा कॅम्प), निलेश कदम (वेळे), दिलीप कदम (रोहिणे) तसेच सल्लागार पदी धनंजय कदम, शशिकांत कदम ( वेळे), आनंद कदम ( करंजवडे/भिवंडी), निलेश कदम ( जांब्रुक/वावंढळ ), सतीश कदम ( भवानी नगर) यांची निवड करण्यात आली आहे.

# भिवंडी मनपा जन्म मृत्यू विभागाचा भोंगळ कारभार ?

### ■ ५ हजार जन्म प्रमाणपत्राचे वाटप ■ राज्य सरकारने चौंकशी करावी..

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


भिवंडी : राज्यात अनधिकृतपणे बोगस कागदपत्रांच्या आधारे जन्म नोंदणी केल्याचा आरोप करीत गत चार महिन्यांपासून राज्य पिंजून काढणारे भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी सोमवारी भिवंडी येऊन जन्म दाखले संदर्भात थेट पालिका आयुक्त अनमोल सागर यांच्याशी चर्चा केली त्यानंतर भिवंडीत 550 हून अधिक जन्म दाखले संशयास्पद असल्याची तक्रार शांतीनगर पोलिस ठाण्यात केली आहे.

या गंभीर प्रकारामुळे महापालिकेच्या जन्म मृत्यू विभाग कार्यालयात गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेला भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. महापालिका जन्म मृत्यू नोंद विभागाने अधिकारी नसताना जन्माला आल्या पासून 30 दिवसानंतर नोंदी साठी आलेल्या 5159 व्यक्तींचे जन्म प्रमाणपत्र दिल्याचे माहिती आता समोर आली आहे.त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वमहापालिका आयुक्त अनमोल सागर यांनी या प्रकरणी सखोल चौकशी करावी अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्यावतीने करण्यात येत आहे.



> जन्म नोंदी बाबत किरीट सोमय्या यांनी घेतलेल्या आक्षेपा नंतर या काळातील सर्व जन्म नोंदी आम्ही तपासणार असून न्यायालयीन आदेशाने झालेल्या नोंदीची पडताळणी न्यायालया मार्फत केली जाणार आहे.त्यानंतर ज्या जन्म नोंदी बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करून केल्या असल्याचे समोर आल्यास त्या बाबत पोलिसांकडे रीतसर तक्रार देऊन संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाईल व तसा अहवाल शासनाकडे देणार अशी माहिती भिवंडी महापालिका वैंद्यकीय विभागाचे प्रमुख डॉ संदीप गाडेकर यांनी दिली आहे.

भिवंडी पालिका जन्म नोंदी नुसार 2024 या संपूर्ण वर्षभरात 3321 तर 2025मे अखेर पर्यंत 1942 जन्म दाखले हे अधिकार नसताना दिले आहेत.जन्म मृत्यू नोंद अधिनियमानुसार जन्मानंतर 30 दिवसा पर्यंत जन्म नोंद केल्यास महापालिका संबंधित विभागास जन्म दाखल देण्याचे अधिकारी आहेत.तर त्यानंतर एक वर्षा पर्यंतच्या कालावधी साठी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या परवानगीने जन्म नोंद करता येते,तर एक वर्षानंतरची जन्म नोंद ही न्यायालयीन प्रक्रिया व त्यानंतर तहसीलदार यांचा आदेशाने होत आली आहे.असे असताना पालिका जन्म नोंद विभागाने 1 जानेवारी ते 31 डिसेंबर 2024 या वर्षभराच्या कालावधीत 30 दिवसा आतील 153 ,एक वर्षां आतील 2770 तर एक वर्षा नंतरच्या 398 जन्म प्रमाणपत्र दिले आहेत.तर १ जानेवारी ते 31 मे 2025 या पाच महिन्याच्या कालावधीत 30 दिवसा आतील 31,एक वर्षां आतील 1516 तर एक वर्षा नंतरच्या वयाच्या 395 जन्म नोंदी केल्या आहेत. या सर्व नोंदी अधिकार नसताना दिल्या गेल्याचे समोर आले आहे. जन्म - मृत्यू विभाग कार्यालयात मोठ्या प्रमाणात अर्थकारण करून दाखले उशीर देण्यात येता या कारणावरून आमदार रईस शेख यांनी गेल्या महिन्यात कार्यालयात येऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांची कान उघडणी केली होती व आयुक्ताना हा गंभीर प्रकार सांगितला होता. मात्र त्याकडे सराईतपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे.




# रायगड स्वच्छता अभियानात नेने महाविद्यालयाचा सहभाग





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : मुंबई विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे किल्ले रायगड येथे विशेष स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.सदर अभियानाअंतर्गत रायगड जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून जवळपास ५५० विद्यार्थी, प्राध्यापक तसेच मुंबई विद्यापीठातील १०० कर्मचारी यांनी एकत्र येऊन शिवराज्याभिषेक सोहळयानंतर किल्ले रायगडाची स्वच्छता केली. या अभियानांतर्गत रिकाम्या प्लास्टिकच्या बाटल्यांच्या जवळपास १५० गोणी भरून रिसायकलिंगसाठी पाठविण्यात आल्या.तसेच अन्य प्रकारच्या कचऱ्याचीही व्यवस्थितरीत्या विल्हेवाट लावण्यात आली.

सदर अभियानात पेणच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील रा.से.यो च्या विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन रायगडावरील स्वच्छता मोहिमेसाठी आपले योगदान देत 'NOT ME BUT YOU' हे रा. से. यो चे ब्रीदवाक्य खरे करून दाखवले. यासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे,डॉ.व्ही.डी .भाबड, प्रा.सौ. एस. एस .पितळे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत मार्गदर्शन केले. सदर अभियानात सहभागी होऊन उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल नेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले व कायम समाजभान राखण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. तर संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करत कायम समाजहित जोपासण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

सदर स्वच्छता अभियानासाठी मुंबई विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. अजय भामरे, रा. से. यो. चे प्रभारी डायरेक्टर सुशील शिंदे, डी. एल .एल. ई चे डायरेक्टर डॉ. बळीराम गायकवाड, जिल्हा समन्वयक प्रा. तुळशीदास मोकल, विविध महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी सहभागी होऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत स्वच्छता अभियान यशस्वी केले.

# अंबरनाथ मध्ये राष्ट्रवादी पक्षाचा वर्धापन दिन संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : इंदिरा काँग्रेस मधून अलिप्त होऊन स्वतःच्या स्वतंत्र राष्ट्रीय पक्षाची स्थापना करणाऱ्या शरदचंद्र पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट २७ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. या निमित्ताने देशभरात वेगवेगळे आनंदोत्सव साजरा केला जातोय . अंबरनाथ मध्ये शहर शाखा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शरद पवार गटाच्या वतीने वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



या निमित्ताने शहरातील महिलांना साड्यां आणि नागरिकांना लाडूंचे वाटप करून राष्ट्रवादीच्या कार्य कर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. सदामामा पाटील प्रतिष्ठान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट ) व गायत्री टेक्सटाईल मार्केट यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवला गेला. मोतीराम पार्क, अंबरनाथ (पूर्व) येथील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात हा आनंदोत्सव संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी माजी नगरसेवक सचिन सदाशिव पाटील हे होते.

तर, कार्यक्रमाला शहर सरचिटणीस धनंजय सुर्वे, आशाताई पाटील, अश्विनी पाटील, विधानसभा अध्यक्ष पुष्पराज (गणेश) गायकवाड, ज्येष्ठ कार्यकर्ते बळीराम साबळे आदी मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आनंद व्यक्त करण्यात येत असून, सामाजिक भान जपत समाजसेवेचा आदर्श उपक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पडघ्यातील कुंभेरी नदीवर जलपर्णीची चादर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील मुबई नाशीक महामार्गालगत असलेल्या पडघा येथील संपुर्ण कुंभेरी नदीवर जलपर्णीची चादर पसरली असुन पाणी दुषीत झाले आहे.

पडघा, राहुर, डोहोळे ग्रामपंचायत हद्दीतून ही नदी वाहत असुन परीसरातील नागरीकांसाठी मुख्य जलस्रोत आहे अनेक गांवाची पाणीपुरवठा योजना या नदीच्या पाण्यावर अवलंबून असुन अनेक नागरीक या नदीच्या पाण्यावर भाजीपाला पिकवून तो विकून व परीसरातील आदीवासी बांधव या नदीवर मासेमारी करुन आपला उदरनिर्वाह चालवतात. मात्र बारमाही वाहणाऱ्या या नदीच्या पाण्यावर सगळीकडे जलपर्णी वाढल्याने नदीचे पाणी दुषीत झाले आहे. तर या नदीकिनारी प्रसिध्द कुंभेरेश्वर महादेव मंदीर असुन शिवरात्री च्या दीवशी मोठी जत्रा या ठिकाणी भरत असल्याने ही नदी शिवभक्तांचे श्रध्दास्थान आहे. तसेच पडघा ग्रामपंचायतीने लाखो रुपये खर्च करुन पथदिव्यांची व्यवस्था करुन कुंभेरी नदीवर श्राद्ध व गणपती विसर्जन घाट बनवला आहे मात्र जलपर्णी सर्व नदीपात्रात पसरल्याने नागरीकांनी याकडे पाठ फिरवल्याचे दिसत आहे.तर गणपती विसर्जन कसे करायचे असे प्रश्न नागरीक विचारत असुन जलपर्णी मुळे उन्हाळयात नदीपात्र आटण्याची शक्यता असल्याचे तज्ञांचें मत असुन संबधीत शासकीय विभागाने जलपर्णी काढुन थांबलेले नदीतील पाणी वाहते करण्याची मागणी नांगरीकानी केली आहे.

### समृद्धी महामार्गावर वाहनांची गर्दी

# मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहतूक रोडावली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : समृध्दी महामार्ग वाहतुकीसाठी खुला झाला असल्याने येथील मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहतूक ओसरली असल्याचे दिसून येते. त्यामुळे महामार्ग लगत असलेल्या हॉटेल, धाबे, चहा-पानटपऱ्या यांच्या धंद्यावर परिणाम झाला आहे.

नुकतेच समृध्दी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्यातील आमणे ते इगतपुरी काम पूर्णत्वास नेऊन हा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. त्यामुळे मुंबई, ठाणे कडून नाशिक कडे जाणाऱ्या प्रवाशी व मालवाहतूक वाहने ही वडपे (भिवंडी ) आमणे वरुन इगतपुरी व पुढील तर नाशिक आदी या भागातील ठाणे, मुंबई कडे येणाऱ्या वाहनं इगतपुरी वरुन वळण घेऊन प्रवास करीत आहेत. त्यामुळे मुंबई-नाशिक महामार्गावरुन वाहने कमी प्रमाणात धावताना दिसतात.



या महामार्गावरील वाहतूक ओसरली असल्याने महामार्ग लगत मोठ्या प्रमाणात असलेल्या हॉटेल, धाबे, चहा-पानटपऱ्या येथील थांब्यांचे प्रमाण कमी झाल्याने त्यांच्या धंद्यावर परिणाम झाला आहे. सध्या वडपे ते कसारा दरम्यान कामानिमित्त काही वाहनधारक वळताना दिसतात तर थोड्या प्रमाणात नाशिक - मुंबई कडील वाहने ये-जा करीत आहेत.

दरम्यान, समृध्दी महामार्ग हा जलदगतीने व सोईस्कर वाहतुकीसाठी झाल्यामुळे बहुतांश वाहन आता या महामार्गानी धावू लागली आहेत. त्यामुळे मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहतूक ओसरली असल्याचे दिसून येते. तर त्यातच वाहनं कमी प्रमाणात ये-जा करु लागल्याने येथील महामार्गा लगतच्या असलेल्या हॉटेल, धाबे, चहा-पानटपरी यांच्या धंदा, व्यवसाय वर परिणाम होऊ लागला आहे.

# फेरीवाला मुक्त डोंबिवली स्थानकासाठी अभिजीत सावंत यांचे उपोषण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली(शरद शहाणे) : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे डोंबिवली शहर प्रमुख अभिजीत आरती अशोक सावंत यांनी डोंबिवलीतील स्वर्गीय इंदिरा गांधी चौकात अमरण उपोषणाला सकाळी 11 वाजेपासून सुरुवात केली आहे.

सन्माननीय न्यायालयाच्या आदेशानुसार डोंबिवली स्टेशन पासून दीडशे मीटर परिसर हा फेरीवाला मुक्त असावा परंतु डोंबिवली पूर्वेकडील स्टेशन परिसर न्यायालयाच्या आदेशाला हरताळ फासला आहे फेरीवाले राजरोसपणे या परिसरात फुटपाथ वर आणि रस्त्यावर व्यवसाय करतात उपोषणकर्त्यांचा या व्यवसायिकांना विरोध नाही परंतु न्यायालयाच्या आदेशानुसार दीडशे मीटर सीमा आखून दिली आहे त्यापुढे व्यवसाय करावा ही उपोषण कर्त्यांची मागणी आहे, स्टेशन परिसरात अफाट गर्दी असल्यामुळे सामान्य नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागतो

या सर्व प्रकरणात महापालिकेने फेरीवाल्यांचे पुनर्वसन करायला हवे होते परंतु महापालिकेने याकडे जाणून-बुजून दुर्लक्ष केले असा उपोषणकर्त्यांचा आरोप आहे.

अभिजीत सावंत 17 एप्रिल रोजी उपोषणाला बसणार असे पत्र महापालिकेला दिले होते परंतु ग आणि फ प्रभात अधिकाऱ्यांनी चर्चेसाठी आमंत्रित केले होते पुनर्रचनेसाठी दीड ते दोन महिने लागतील आपण कृपया उपोषणाला बसू नये असे सावंत यांना सांगण्यात आले होते परंतु महापालिकेने काहीच कारवाई केलेली दिसत नाही केले नाही म्हणून आणि नागरिकांना फेरीवाला मुक्त स्टेशन परिसर मिळावा म्हणून आज पासून अमरण ऊपोषणाला सुरुवात केली आहे




# गाडगे महाराज आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आवाहन


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील) : श्री गाडगे महाराज प्राथमिक /माध्यमिक अनुदानित आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक मोफत प्रवेश देणे सुरू असून ग्रामीण भागातील पालकांनी प्रवेशासाठी शाळा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

येथील श्री गाडगे महाराज प्राथमिक/माध्यमिक अनुदानित आदिवासी आश्रमशाळेत शैक्षणिक वर्ष सन 2025-26 साठी इयत्ता पहिली ते नववी वर्गात निवासी अनिवासी प्रवेश देणे सुरू असून इच्छुक आदिवासी पालकांनी आपल्या मुलां-मुलींच्या प्रवेशासाठी शाळेचे माध्यमिक मुख्याध्यापक आनंद वानखेडे, प्राथमिक मुख्याध्यापिका सारीका गायकवाड यांच्याशी कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे वतीने करण्यात आले आहे.

सदर, शाळेत नियमित मिळणाऱ्या सुविधा बरोबरच विशेष बास्केटबॉल मैदान व बंकबेडच्या सुविधा उपलब्ध असून शाळेत शैक्षणिक अध्यापन बरोबर इतर विविध उपक्रम राबविले जात आहेत.

# सोमवारी भिवंडीत पाणीपुरवठा बंद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी ; भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना कळविण्यांत येते की, स्टेम वॉटर डिस्ट्री, अँड इन्फ्रा, कंपनी प्रा.लि. ठाणे यांचेकडून दैनंदिन देखभाल दुरुस्ती करीता वार सोमवार दि.१६/०६/२०२५ सकाळी ९.०० वाजे पासून ते मंगळवार दि.१७/०६/२०२५ सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तासांचा शटडाऊन घेण्यात येणार आहे. त्यामुळे भिवंडी शहरांसाठी स्टेम मार्फत होणारा पाणी पुरवठा बंद राहणार आहे व पुढील एक दिवस कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा होणार आहे. याची नागरीकांनी नोंद घेऊन महानगरपालिकेस सहकार्य करावे, ही विनंती.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून,
एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024